3 JAN 2019

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अस्पृश्यता हीनतेचे नव्हे, दीनतेचे कारण

## डॉ. गोपाळ गुरू : विद्यापीठात महर्षी शिंदे पुण्यतिथीनिमित्त एकदिवसीय चर्चासत्र

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

अस्पृश्यता हे हीनतेचे नव्हे, तर दीनतेचे कारण आहे. अस्पृश्यता वाहती राखण्यात उच्चवर्णीय समाजाचा स्वार्थ आहे. कारण ती तुंबली की संपली, याची जाणीव असल्याने ती थांबवली जात नाही. त्यामुळे महर्षी शिंदे या साऱ्या व्यवस्थेला 'बहिष्कृतांची बंदिशाळा' असे संबोधतात, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. गोपाळ गुरू यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन आणि एन. डी. पाटील प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महर्षी शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न : संशोधन व कार्य' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. गोपाळ गुरू म्हणाले, अनुभवशील चिंतनातून संशोधनपर लेखनामध्ये झळकणारा अस्सलपणा हे महर्षी वि. रा. शिंदे यांच्या साहित्याचे महत्त्वपूर्ण गुणवैशिष्ट्य आहे. या वैशिष्ट्यामुळेच भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नाची अत्यंत मूलभूत आणि वस्तुनिष्ठ मांडणी त्यांना करता आली. मायावी अर्थव्यवस्था, कृत्रिम वर्णव्यवस्था आणि दमट ग्रामव्यवस्था या तीन व्यवस्थांनी भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न जटिल करून ठेवण्याचे काम केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न : संशोधन आणि कार्य' या विषयावर आयोजित एकदिवसीय चर्चासत्राचे बीजभाषण करताना डॉ. गोपाळ गुरू. व्यासपीठावर डॉ. रणधीर शिंदे, डॉ. राजन गवस, डॉ. भारती पाटील, डॉ. नागनाथ कोतापल्ले.

महर्षी शिंदे यांची त्यांच्या हयातीत आणि त्या उपरांतही मोठी सामाजिक उपेक्षा झाली. समाजाला खोलवर विचार करणारे लोक नको असतात आणि महर्षी हे त्यांनी अंगीकारलेल्या अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नाचा अत्यंत खोलवर, सर्वांगीण आणि कृतिशील विचार करणारे होते. साहजिकच त्यामुळे समाजाने त्यांच्यावर उपेक्षेचे शिक्कामोर्तब केले.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, महर्षी शिंदे हे एक क्रांतिकारक समाजसुधारक होते. आपली संपूर्ण हयात त्यांनी अस्पृश्यता निवारणासारख्या मूलभूत प्रश्नासाठी वेचली आणि आपल्या कार्याने साऱ्या महाराष्ट्राची मान उंचावली. महाराष्ट्राने मात्र त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा फारसा गांभीर्याने विचार केला नाही. तरीही अस्पृश्योद्धाराचे कार्य सर्व तऱ्हेची उपेक्षा सोसून ते करत राहिले. एकट्यानेच नव्हे, तर साऱ्या कुटुंबीयांना सोबत घेऊन त्यांनी हे काम केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. भारती पाटील म्हणाल्या, अस्पृश्यतेच्या प्रश्नाची मूलभूत मांडणी करण्याबरोबरच त्याला सांख्यिकीय मांडणीची जोड देऊन या प्रश्नाचे गांभीर्य साऱ्या देशाला पटवून देण्याचे काम महर्षी वि. रा. शिंदे यांनी देशात सर्वप्रथम केले.

महाराष्ट्र राज्य वाङ्मय पुरस्कार प्राप्त करणारे ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार आणि साहित्यिक कृष्णात खोत यांचा डॉ. गुरू यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यासनाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. भारत पाटणकर, डॉ. गेल ऑम्वेट, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. जगन कराडे, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. व्यंकाप्पा भोसले, डॉ. अरुण शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. मेघा पानसरे, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, डॉ. रफिक सूरज, डॉ. सुरेश शिपूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकमत

# ‘अस्सलपणा महर्षी शिंदे यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य’

## गोपाळ गुरू : विद्यापीठात ‘भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न : संशोधन व कार्य’ याविषयी चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अनुभवशील चिंतनातून संशोधनपर लेखनामध्ये झळकणारा अस्सलपणा हे महर्षी वि. रा. शिंदे यांच्या साहित्याचे महत्त्वपूर्ण गुणवैशिष्ट्य आहे. या वैशिष्ट्यामुळेच भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नाची अत्यंत मूलभूत, वस्तुनिष्ठ मांडणी त्यांना करता आली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. गोपाळ गुरु यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन आणि एन. डी. पाटील प्रतिष्ठानच्या वतीने महर्षी शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित ‘भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न : संशोधन व कार्य’ या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, तर ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील, माजी कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले प्रमुख उपस्थित होते.

डॉ. गुरु म्हणाले, आत्मटीका हासुद्धा महर्षींच्या लेखनाचा गुणधर्म होता. या आत्मटीकेचे प्रतिबिंब

नसीर अत्तार



**कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे आयोजित चर्चासत्रात ज्येष्ठ विचारवंत डॉ. गोपाळ गुरु यांनी विचार मांडले. यावेळी डावीकडून रणधीर शिंदे, राजन गवस, भारती पाटील, नागनाथ कोत्तापल्ले उपस्थित होते.**

तीसुद्धा त्यांच्या उपेक्षेला कारण ठरली. मात्र, त्याची तमा न बाळगता महर्षी शिंदे हे कार्यरत राहिले.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. पाटील म्हणाले, महर्षी शिंदे यांनी आपली संपूर्ण हयात अस्पृश्यता निवारणासारख्या मूलभूत प्रश्नासाठी वेचली. आपल्या कार्याने महाराष्ट्राची मान उंचावली.

महाराष्ट्राने मात्र त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा फारसा गांभीर्याने विचार केला नाही. तरीही

उपेक्षा सोसून ते आपल्या कुटुंबीयांना सोबत घेऊन करीत राहिले. हे त्यांच्या कार्याचे तत्कालीन समाज परिस्थितीत फार झळाळून उठून दिसणारे वैशिष्ट्य आहे.

डॉ. भारती पाटील म्हणाल्या, अस्पृश्यतेच्या प्रश्नाची मूलभूत मांडणी करणे, त्याला सांख्यिकीय मांडणीची जोड देऊन या प्रश्नाचे गांभीर्य देशाला पटवून देण्याचे काम महर्षी शिंदे यांनी सर्वप्रथम केले.

या कार्यक्रमात राज्य वाङ्मय

जयसिंगराव पवार, साहित्यिक कृष्णात खोत यांचा डॉ. गुरु यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस, अशोक चौसाळकर, टी. एस. पाटील, भारत पाटणकर, गेल ऑम्व्हेट, रत्नाकर पंडित, जगन कराडे, व्यंकाप्पा भोसले, अरुण शिंदे, अवनीश पाटील, मेधा पानसरे, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, रफिक सूरज, सुरेश शिपूरकर, आदी उपस्थित होते. अध्यासनाचे प्रमुख रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. नंदकुमार मोरे यांनी

### स्वतंत्रपणे अभ्यासाची गरज

- अस्पृश्यता वाहती राखण्यात उच्चवर्णीय समाजाचा स्वार्थ आहे; कारण ती तुंबली की संपली, याची जाणीव असल्याने ती थांबविली जात नाही.
- त्यामुळे महर्षी शिंदे या व्यवस्थेला ‘बहिष्कृतांची बंदिशाळा’ असे संबोधतात. अशी अनेक रुपके महर्षींच्या लेखनात जागोजागी आढळतात. त्यांचाही स्वतंत्रपणे अभ्यास करण्याची गरज आहे, असे डॉ. गुरु यांनी सांगितले.

3 JAN 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# सावित्रीबाई फुलेंच्या कवितांचे मूल्यांकन व्हावे

## प्रा.डॉ. पद्मा पाटील : मराठीतील पहिल्या कवयित्रीकडे मराठी साहित्य जगताचे आजवर दुर्लक्ष

संजीव खाडे
कोल्हापूर

सावित्रीबाई फुले या एक सृजनशील, प्रतिभासंपन्न कवयित्री होत्या. त्यांनी आपल्या कवितांच्या माध्यमातून सामाजिक अन्यायाला वाचा फोडली. त्या काळात वात्सल्य, प्रेम, पतीप्रेम, मातृप्रेम या संदर्भातील स्त्री विषयक काव्य उपलब्ध होते. अशा काळात सामाजिक अन्याय, अत्याचाराची अभिव्यक्ती करणारे काव्य, कविता लिहण्याचे प्रचंड अवघड असे काम सावित्रीबाईंनी केले. मात्र मराठी साहित्य जगताने कवयित्री सावित्रीबाई आणि त्यांच्या काव्य, कवितांची कधीही दखल घेतली नाही. त्याकडे दुर्लक्ष केले, अशी खंत शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. पद्मा पाटील यांनी व्यक्त केली.

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला डॉ. पद्मा पाटील यांनी 'तरुण भारत'ला दिलेल्या मुलाखतीत 'कवयित्री सावित्रीबाई फुले" यावर आपली मते मांडली. त्या म्हणाल्या, सावित्रीबाईंनी पती महात्मा जोतिबा फुले यांना त्यांच्या सामाजिक सुधारणेच्या चळवळीत मोलाची आणि क्रियाशील साथ दिली. ज्या काळात सामाजिक अन्याय अत्याचाराविषयी बोलण्याचे धाडस कुणीही करत नव्हते अशा काळात कवितेच्या माध्यमातून त्यांनी शोषित, वंचितांची स्थिती, अवस्था कवितेतून प्रकट केली. सनातन्यांशी संघर्ष करताना त्यांनी स्त्री अत्याचार आणि चुकीच्या परंपरा तोडण्याचे काम केले. त्यांची अभिव्यक्ती त्यांच्या कवितेतून दिसते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजामाता, छत्रपती रणरागिणी ताराराणी यांच्यावर अप्रतिम कविता लिहिल्या आहेत.



डॉ. पद्मा पाटील

महात्मा फुलेंप्रमाणे सावित्रीबाईंनी देवाचे अस्तित्व नाकारले. शंकर भक्ती गीतात त्यांनी शंकराला आदीनिर्मिक मानले आहे. ज्ञानदानाची आंतरीक तळमळ, अज्ञान जाण्यासाठी ज्ञानप्राप्ती झाली पाहिजे, असा आग्रह त्यांनी शेवटपर्यंत धरला. पती महात्मा फुलेंच्या निधनानंतरही त्यांनी त्यांचे कार्य पुढे नेताना कविताही केल्या. त्यांच्या १८५४ मध्ये सावित्रीबाईंच काव्यफुले नावाचा काव्य संग्रह प्रसिद्ध झाला होता. त्यामध्ये ४१ कविता, रचना आहेत. त्यामध्ये उपदेश आहे, मनोरंजन आहे. 'काव्यफुले"मध्ये जोतिबांना नमस्कार आणि जोतिबांचा बोध या दोन कवितांव्दारे आपले पती महात्मा फुलेंचे सत्यधर्माचा संस्थापक, प्रेरक, मार्गदर्शक, ज्ञानदाता, स्वामी, आवडीचा देव अशा शब्दात वर्णन केले आहे. त्यांच्या कविता, कार्य हिंदी भाषेतून देशभर पोहचविण्याचे काम मी करत आहे. पण खंत एका गोष्टीची खंत आहे, ती म्हणजे सावित्रीबाईंच्या साहित्य, कवितांकडे मराठी साहित्य जगताने नेहमीच दुर्लक्ष केले. आता तरी त्यांच्या कवितांचे मूल्यांकन करावे, एवढीच अपेक्षा आहे, असेही डॉ. पद्मा पाटील यांनी सांगितले.

**सावित्रीबाई फुलेंची काव्य रचना**

छत्रपती शिवाजीचे प्रातः स्मरण करावे
शुद्रादी अतिशुद्रांचा प्रभू वंदू मनोभावे
नळराजा युधिष्ठिर दौपदीही जर्नादन
पुण्यश्लोक पुराणात इतिहासी शिवानन
**(छत्रपती शिवाजी)**

छत्रपती सिंहासनीची एक राणी ताराबाई
कोल्हापूरची जगदंबा महाराष्ट्राची अंबाई
शत्रूवर झाली छाया कल तयाची ती होई
जेरीस शत्रुला करूनी करी बेफामी लढाई
**(राणी छत्रपती ताराबाई)**

कोल्हापूरची महान राणी
छत्रपती शोभते भूषणी
शुभहस्ते तलवार भवानी
ताराबाई असुर मर्दानी
**(राणी छत्रपती ताराबाई)**